रे. दिवाणी मुकदमा क्र. ११५/२०१४ मधील निशाणी क्र. ५१ वरील आदेश
(पोपट गुजले वि तानाजी शिरतोडे)
(CNR No. MHSN130004492014

१. वादी यांनी सदरचा अर्ज हा दावा दुरुस्त होवून मिळणेकामी दाखल केलेला आहे. देवराष्ट्रे येथील गट क्र. २४०/२ व २४१/३ या वाद मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र वारसाहक्काने मालक आहे असे जाहीर होवून मिळणेकामी दावा दाखल केलेला आहे. वादींचा भाऊ जगन्नाथ आबा गुजले यांनी विमल उत्तम घळगे व यशवंत तुकाराम मदने यांना ती मिळकत गहाण दिलेली होती. तर ती वादींना उलटून घेणे आवश्यक असलेचे वाटलेने त्यांनी सदरचा अर्ज केलेला आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे मिळकत क्र.२४०/२ पैकी १/३ हिस्सा हा प्रवादी क्र. ७ यांना २४/०३/२००६ च्या दस्ताने गहाण दिलेला असून जगन्नाथ गुजले यांनी प्रवादी क्र. ५ यांना १,२०,०००/- रकमेसाठी ता. २४/६/२००९ ला २४०/२ पैकी ३ आणे ४ पैचे हिस्से गहाण दिलेले असून विमल घळगे व यशवंत मदने यांचे नांवे १ आणे ६ पैचे क्षेत्र शिल्लक राहिलेले आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे या दावेचे कामी त्यांनी केलेली विनंती पाहता त्याअनुषंगाने संबंधीत व्यक्तींना पक्षकार करणे आवश्यक असलेने त्यांनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

२. या अर्जास प्रवादी क्र ४ ते ७ यांनी आपले म्हणणे नि.५३ वर दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कैफियत या दावेचे कामी त्यांनी २०१५ साली

त्यांनी दाखल केली असून त्यामध्ये विस्तृत कथन केलेले आहे. प्रवादी क्र. ४ ते ७ यांच्या म्हणण्याप्रमाणे नॉन जाईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज तत्वाची बाधा या दावेस येत असलेने त्याप्रमाणे ती प्रवादींनी यापूर्वीच नमूद केलेली होती. तसेच त्यांनी कैफियतीमध्ये विमल व यशवंत यांचेबाबत विस्तृतपणे म्हणणे मांडलेले होते. त्यानंतर दावेचे कामी सुनवाई घेणेत आली व पुरावाही नोंदविणेत आला. वादी यांनी सदरची गोष्ट समजलेपासून तीन वर्षाच्या कालावधीमध्ये कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे मुदतीच्या कायदयाची बाधा उत्पन्न होते व म्हणून त्यांनी सदरचा अर्ज रदद करणेसाठी विनंती केलेली आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी क्र.५ यांच्या गहाणाची मुदत तेरा वर्षाची असलेने ती उलटून देणे बाकी आहे. तसेच त्या मिळकतीमध्ये त्यांनी ज्या सुधारणा केलेल्या आहेत त्या लक्षात घेता त्यांचे जे नुकसान संभावू शकते त्याची गणना पैशाच्या स्वरुपात करता येवू शकत नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज रदद करणेविषयी विनंती केलेली आहे.

३. वादी व प्रवादी यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकलेवर व दोन्ही बाजूंचे म्हणणे पडताळून पाहिलेवर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाचे कामी काढण्यात येतात.

| **अ.क्र.** | **गुण** | **उत्तर** |
|---|---|---|
| १ | वादी यांना दुरुस्तीद्वारे पार्टी सामील करुन घेणेचा हक्क आहे काय ? | होय |
| २ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### गुण क्रमांक १

४. या दावेचे कामी वादी यांनी आपला पुरावा जरी सादर केला असला तरी त्यांनी जी दुरुस्ती दाव्यात नमूद केलेली आहे ती प्रवादी क्र. ९ व १० सामील होवून मिळणेविषयी केलेली आहे. प्रवादी क्र. ४ ते ७ यांनी जे म्हणणे नमूद केलेले आहे ते त्यांच्या व्यक्तीगत बचावासंदर्भात आहे. वादी यांनी केलेला दावा पाहता तो त्यांनी वारसाहक्काने मालक झालेले आहेत असे ठरवून मिळणेसाठी व कब्जा मिळणेसाठी विनंती केलेली आहे. सदर विनंती विषयी जर कायदेशीर अडचण निर्माण होत असेल तर ती पुराव्याद्वारे पुढे स्पष्ट होवू शकते. वादी व प्रवादी त्याबाबत आपला योग्य तो पुरावा त्याविषयावर सादर करु शकतील. याद्वारे वादाचे निरसन होवू शकते. सदरचा अर्ज जर सुनवाईअभावी राहिला तर वाद मिळकतीविषयी असणारे सर्व व्यवहार हे दावेचे सुनवाईचेकामी सामील होवू शकणार नाहीत. तसेच ज्या व्यक्तींना त्यामध्ये हक्क प्राप्त झालेले आहेत त्यांनाही पुरावा देणेची संधी उपलब्ध होवू शकणार नाही. प्रवादी क्र. ९ व १० यांना पार्टी केले गेलेस त्याचा परिणाम प्रवादी क्र. ४ ते ७ यांच्या पुराव्यावर होवू शकणार नाही. कारण प्रवादी क्र.९ व १० यांना स्वतःची कैफियत मांडणेचे स्वातंत्र उपलब्ध आहे. त्यामुळे वादी यांनी केलेली विनंती योग्य असलेने गुण क्रमांक १ चे उत्तर

होय म्हणून देणेत येते.

५. वादी यांनी सदरचा अर्ज हा पार्टी सामील होवून मिळणेकामी सादर केलेला आहे. वादींनी सादर केलेले कारण पाहता ते संयुक्तीक असलेने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतात.

## आदेश

१. वादी यांचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी प्रवादी क्र. ९ व १० यांना दावेचे कामी सामील करुन घेवून आवश्यक दुरुस्ती दावेचे कामी १५ दिवसाचे आत करुन घेणेची आहे.

३. वादी यानी प्रवादी क्र. ४ ते ७ यांना प्रत्येकी २००/- रु. खर्च अदा करणेचा आहे.

सही/-

कडेगांव

(वि.रा. घराळ)

दिनांक – १४/०२/२०१९

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव